**नियमित दावा क्र.११९/२०१५ मधील निशाणी क्रमांक ९३ वरील आदेश**

दत्ता पाटील वि. प्रमोद व इतर.

CNRNO.MHSN070008542015

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांच्यातर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेशिका ६ नियम १७ प्रमाणे त्यांचा लेखी जबाब दुरुस्त करणेसाठी दाखल केला आहे.

०२. प्रस्तुतचा दावा कायम ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी कथन केले की, त्यांनी सदर दाव्यास कैफियत दाखल केलेली आहे. सदर कैफियतीमध्ये पान क्र.२ वरती कलम १०(अ) मधील सातव्या ओळीत मिळकतीच्या चतुःसिमेमध्ये उत्तरेस–गट नं.१०४१ च्यापुढे टंकलेखनाच्या चुकीमुळे 'व गट नं. १०३८' असे नमूद झालेले आहे. सदरची चुक ही टंकलेखनाच्या दोषामुळे व नजर चुकीने झालेली आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे दुरुस्ती करणेबाबत अर्जदारांनी विनंती केलली आहे.

०३. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. लेखी जबाबातील तांत्रीक चुक लक्षात येताच सदरचा अर्ज विनाविलंब करण्यात आलेला आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून सदरच्या दुरुस्तीमुळे वादी,प्रतिवादी यांच्यातील वादातील उकल होण्यास मदतच होणार आहे. तरी न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०४. प्रस्तुतच्या अर्जास वादी यांनी त्याचे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला. वादी यांनी कथन केले की, केवळ दाव्यास विलंब होण्यासाठी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज उलटतपासातील महत्वाच्या बाबी भरुन काढण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होतो. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करता येणार नाही. वरील कारणांमुळे अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

०५.	अर्ज व त्यावरील उत्तराचे अवलोकन केले. वादी व अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६.	अर्ज, म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रे व दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापूढे नोंदवलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क.** | **मुददे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित दुरुस्ती वादाचे निरसरन करण्याकामी आवश्यक आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलते काय ? | नकारार्थी. |
| ३ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

<u>कारणमिमांसा</u>.

**<u>मुददे क्र. १ व २ करीता</u>**

०७.	सदरचे मुददे ऐकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे व कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता कारणमिमांसेकरीता एकत्रीत घेण्यात येत आहे.

०८.	अर्जदाराने कथन केले की, त्यांच्या कैफियतीमध्ये पान क्र.२ वरती कलम १०(अ) मधील सातव्या ओळीत मिळकतीच्या चतुःसिमेमध्ये उत्तरेस–गट नं.१०४१ च्यापुढे टंकलेखनाच्या चुकीमुळे 'व गट नं. १०३८' असे नमूद झालेले आहे. सदरची चुक ही टंकलेखनाच्या दोषामुळे व नजर चुकीने झालेली आहे. टंकलेखनाची चुक तांत्रीक अडचण टाळण्यासाठी दुरुस्त करणे अत्यावश्यक आहे. तसेच प्रस्तावित दुरुस्ती कोणत्याही नवीन मागणी करीता अथवा नवीन मिळकतीकरीता नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपामध्ये देखील कोणताही बदल होत नाही. तसेच प्रस्तावित

दुरुस्तीमुळे वादीस कोणतेही नुकसान होत नाही. परंतु प्रस्तुतचा अर्ज दाव्याची सुनावणी सुरु होण्यापूर्वी दाखल करण्यात आलेला नाही. तसेच टंकलेखनाचा दोष अर्जदारास कधी निष्पन्न झाला याबाबत स्पष्टपणे अर्जात नमूद नाही. थोडक्यात, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास अर्जदाराने दिरंगाई केलेली आहे. करीता सदरच्या दिरंगाईकरीता अर्जदारांवर खर्च लादणे आवश्यक आहे. करीता मुद्दा क्र. १ वरील निष्कर्ष मी होकारार्थी व मुददा क्र. २ वरील निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्र. ३ करिता</u>**

०९. वरील कारणांवरुन मी या निष्कर्षाप्रत येतो की, प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित ठरते. वरील कारणांवरुन मुददा क्र. ३ करीता मी खालील आदेश पारित करतो–

## आदेश

१. नि.क्र. ९३ वरील अर्ज खर्च रक्कम रुपये पाचशे वादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र.९३ वरील अर्जान्वये प्रस्तावित दुरुस्ती नेमलेल्या पुढील तारखेपर्यंत करावी असे अर्जदारास आदेशित करण्यात येते.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.08.06 07:42:16 +0530

(अरुण र. व्यवहारे)

दिनांक ०५.०८.२०२४

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -05.08.2024
Order signed by the
Presiding Officer on -05.08.2024
Order uploaded on 06.08.2024

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 19.12.2023
Order signed by the
Presiding Officer on -19.12.2023
Order uploaded on -20.12.2023